फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

नाशिक जिल्हा

१९८८-८९

अर्थ व सांख्यिकी संचालनालय
महाराष्ट्र शासन
मुंबई

फक्त कार्यालयीन वापरासाठी.

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

जिल्हा - नाशिक

१९८८-८९

अर्थ व सांख्यिकी संचालनालय

महाराष्ट्र शासन

मुंबई

दृष्टिक्षेपांत नाशिक जिल्हा.

अ. क्र.	बाब	परिमाण	जिल्हा-नाशिक १९८८-८९	महाराष्ट्र १९८८-८९
१	२	३	४	५
१]	प्राकृतीक रचना:			
	अ] भौगोलिक स्थान.			
	१. उत्तर अक्षांश	अंश	१९.३३ ते २०.५३	१६.४ ते २२.१
	२. पूर्व रेखांश	अंश	७३.१६ ते ७५.१६	७२.६ ते ८०.९
	ब] हवामान[१९८८] तपमान	सेल्सिअस		
	१. किमान	सेल्सिअस	९.०	५.१
	२. कमाल	सेल्सिअस	४०.७	४६.०
	३. पर्जन्य [सरासरी]	मि.मी.	९१५.८	उ.ना.
	क] प्रशासकीय विभाग [१एप्रिल]			
	१. तालुके	संख्या	१३	३०३
	२. पंचायत समित्या	--"--	१३	२९८
	३. टंचाईग्रस्त तालुके [८७-८८]	--"--	५	१३०
	४. एकात्मिक ग्रामीण विकास प्रकल्प गट.	--"--	१३	२९८
	५. शहरे	--"--	१९	३०७
	६. गांवे [एकूण]	--"--	१७४६	४१८३३
	१] निर्जन	--"--	४	२४७९
	२] वस्ती असलेली	--"--	१७४२	३९३५४
	७. क्षेत्रफळ	चौकिमी.	१५५३०	३०७६९०
२]	प्रशासकीय संस्था [३१.३.८९]			
	१. पंचायत समित्या	संख्या	१३	२९८
	२. महानगरपालिका	--"--	१	११
	३. नगर परिषदा	--"--	९	२२२
	४. कटक मंडळे	--"--	१	७
	५. ग्राम पंचायती [३१.३.८९]	--"--	१२९१	२५१८२
	६. पोलीस स्थानके[१.१२.८८]	--"--	३८	८०८
	७. पोलीस औट पोस्ट[१.१२.८८]	--"--	३९	१२१६
३]	लोकसंख्या [१९८१]			
	१. ग्रामीण लोकसंख्या	"०००"	२०६४	४०७९२
	२. नागरी लोकसंख्या	"०००"	९२८	२१९९३
	३. एकूण लोकसंख्या	"०००"	२९९२	६२७८४
	४. अनुसूचित जातीची लोकसंख्या	"०००"	१८६	४४८०
	५. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी.	टक्केवारी	६.२१	७.१४
	६. अनुसूचित जमातीची लोकसंख्या	"०००"	७०२	५७७२
	७. अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी.	टक्केवारी	२३.४५	९.१९

१	२	३	४	५.
	८. पुरुष	"०००"	१५४५	३२४१५
	९. स्त्रिया	"०००"	१४४७	३०३६९
	१०. स्त्री-पुरुष प्रमाण १००० पुरुषामध्ये स्त्रियांचे प्रमाण.	दरहजारी	९३०	९३७
	११. घनता दर चौ. कि.मी. क्षेत्रातील	लोकसंख्या	१९३	२०४
	१२. साक्षरतेचे प्रमाण.			
	१] एकूण	टक्केवारी	४४.३६	४७.१८
	२] पुरुष	—"—	५६.०९	५८.७९
	३] स्त्रिया	—"—	२१.८५	३४.७९
	४] राज्यामध्ये जिल्ह्याचा क्रमांक	क्रमांक	१५	–
४]	कृषि [१९८७-८८] माहिती अस्थायी.			
	१. भौगोलिक क्षेत्र	"०००"हे.	१५६३	३०७५८
	२. जंगलव्याप्त क्षेत्र व त्याची भौगोलिक	—"—	३३९	५४०९
	क्षेत्राशी टक्केवारी	टक्केवारी	[२१.६८]	[१७.५९]
	३. शेतीला उपलब्ध नसलेली जमिन [१९८७-८८]			
	अ] बिगरशेती वापराखालील जमिन	"०००"हे.	११	१०८१
	ब] पडिक व लागवडीलायक नसलेली जमिन.	—"—	९१	१७२०
	क] एकूण	—"—	१०२	२८०१
	४. पडिक जमिनी व्यतिरिक्त लागवड न केलेली इतर जमिन [८७-८८]			
	१] कायम गुरेचरण व इतर	—"—	५१	१५३८
	२] झाडे झुडपाखालील जमिन	—"—	८	१८०
	३] लागवडीलायक परंतू पडित	—"—	६६	१०२७
	५. पडिक जमिन [१९८७-८८]			
	१] चालू पड	—"—	६७	९०७
	२] इतर पड	—"—	५७	१०१५
	६. पिकाखालील क्षेत्र [१९८७-८८]			
	१] पिकाखालील निव्वळ क्षेत्र	—"—	८७२	१७८८१
	२] दुसोटा क्षेत्र	—"—	३५	२२५०
	३] एकूण पिकाखालील क्षेत्र	—"—	९०७	२०१३१
	७. ओलिताखालील क्षेत्र [१९८८-८९]			
	१] निव्वळ ओलित क्षेत्र	—"—	उ.ना.	२०९१
	२] एकूण ओलित क्षेत्र	—"—	उ.ना.	२६८९
	८. महत्त्वाच्या पिकाखालील क्षेत्र [अन्नधान्य] १९८८-८९	—"—	उ.ना.	१४१२३
	९. वहितधारण जमिनी १९८५-८६ अंतीम.	संख्या		
	१] २हेक्टर पेक्षा कमी	"००"	उ.ना.	४५९१६
	२] २ ते १० हेक्टर	—"—	उ.ना.	३२७३८
	३] १० हेक्टर पेक्षा जास्त	—"—	उ.ना.	२३५९
	१०. जमिन महसूल वसूली [१९८८-८९]	लाख रू.	११२	१४०७
	११. जिल्हा परिषदेचा उपकर[—"—]	—"—	३९	उ.ना.

१	२	३	४	५
	१२. पंचायत समितीचा उपकर	लाख रु.	३९	उ. ना.
५]	पशु संवर्धन [पशुगणना-१९८७] अस्थायी.			
	१. पशुधन संख्या	"०००"	१८१५	३३८८९
	२. गायी व बैल	—"—	८९१	१६८८२
	३. म्हशी व रेडे	—"—	१६३	४६०५
	४. मेंढ्या	—"—	२५१	२७७४
	५. शेळ्या	—"—	५०७	९१०३
	६. कोंबड्या व बदके	—"—	११९०	२४६२७
६]	सहकार [१९८८-८९]			
	१. सहकारी संस्था	संख्या	४२८९	९२५०७
	२. प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था	—"—	८१३	१८५०९
	३. प्राथमिक कृषि सभासद संख्या	"०००"	२४८	७०२५
	४. दुग्धशाळा संस्था	संख्या	४९२	१२९६०
	५. प्राथमिक कृषि पतसंस्थांनी दिलेलीकर्जे	कोटी रुपये	८१	७१५
७]	जलसिंचन [३०.६.८८ रोजी]			
	१. पुर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प व त्यांखालील लाभक्षेत्र.			
	१] मोठे प्रकल्प	संख्या	८	१७
	लाभक्षेत्र	"०००"हे.	१३६	उ. ना.
	२] २] मध्यम प्रकल्प	संख्या	७	१४०
	लाभक्षेत्र	"०००"हे.	५७	उ. ना.
	३] लघु प्रकल्प [पृष्ठभाग]	संख्या	२६२	१३८९
	लाभक्षेत्र	"०००"हे.	५५	उ. ना.
	४] सिंचन विहिरीखालील भिजपाटे क्षेत्र [१९८६-८७]	"०००"हे.	१०८	११९९
८]	उद्योग [१९८८ अखेर]			
	१. नोंदणीकृत कारखाने	संख्या	१०७५	२५८३९
	२. नोंदणीकृत चालू कारखाने [उत्पादन चालू असलेले]	—"—	९९७	२१७८५
	३. साखर कारखान्यांची संख्या [चालू असलेले खाजगी धरून]	—"—	७	११६
	४. साखर कारखान्यातील उत्पादन	"०००"टन	४११	२६२९
	५. सूत गिरण्यांची संख्या	संख्या	३	१२१
९]	बीज.			
	१. बीज पुरवठा केलेली शहरेच खेडी [३१.३.८९ अखेर]	संख्या	१७६१	३९४१३
	२. विद्युतीकरण झालेल्या गावांची संख्या	—"—	१७४२	उ. ना.
	३. बीज पुरवठा केलेले पंपसंच	—"—	१६०५१	१३९४३०५
	४. गोबर गॅस संयंत्रे	—"—	१६५६	उ. ना.
१०]	सार्वजनिक आरोग्य [१९८८]			
	१. रुग्णालये	संख्या	४१	७६८
	२. दवाखाने	—"—	९३	१७९९

१	२	३	४	५
	३. प्राथमिक आरोग्य केंद्र	संख्या	९५	१५३९
	४. प्राथमिक आरोग्य पथके	—"—	९	११८
	५. एकात्मिक बालविकास योजना गट	—"—	११	१०५
	६. अंगणवाडीत उपस्थित राहणारी मुले	—"—	६०३८०	उ. ना.
११]	शिक्षण [१९८८-८९]			
	१. एकूण प्राथमिक शाळा	संख्या	उ. ना.	५५५६८
	२. एक शिक्षकी शाळा	—"—	उ. ना.	१६७४६
	३. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्या	"०००"	उ. ना.	९९६०
	४. प्राथमिक शाळेतील शिक्षक	—"—	उ. ना.	२५८
	५. प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थी	—"—	उ. ना.	३९
१२]	दुय्यम शिक्षण [१९८८-८९]			
	१. दुय्यम शाळा [माध्यमिक शाळा]	संख्या	उ. ना.	८८६४
	२. शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या	"०००"	उ. ना.	५१०१
	३. शाळेतील शिक्षक	—"—	उ. ना.	१६८
	४. प्रत्येक शिक्षकामागे माध्यमिक शाळेतील विद्यार्थी.	संख्या	उ. ना.	३१
१३]	उच्च शिक्षण [३०.९.८९ अखेर]			
	१. एकूण संस्था	संख्या	उ. ना.	१००२
	२. एकूण विद्यार्थी संख्या	"०००"	उ. ना.	१०१६
१४]	प्रौढ शिक्षण [१९८८-८९]			
	अ] प्रौढ शिक्षण केंद्रे	संख्या	१०४७.	३०५५३
	ब] प्रौढांची उपस्थिती संख्या	"०००"	३०	५२३
	तांत्रिक शिक्षण [१९८८-८९]			
	१. औद्योगीक प्रशिक्षण संस्था	संख्या	९	११२
	१] शासकीय व शासन सहाय्यीत	—"—	५	११२
	२] इतर [खाजगी]	—"—	४	९९
	२. शासकीय व शासन सहाय्यीत औद्योगीक प्रशिक्षण संस्थांमध्ये मंजूर झालेल्या जागा.	—"—	२१९२	४२३२८
	३. तांत्रिक व व्यवसायीक शिक्षण			
	१] शासकीय व शासन सहाय्यीत	संख्या	४	१६५
	२] इतर [खाजगी] ८८-८९	—"—	१३	६४५
	४. शासकीय व तांत्रिक व्यवसाय शिक्षण संस्थांची प्रवेश क्षमता [१९८८-८९]	संख्या "०००"	२	११६
	५. अभियंत्यांची संख्या	—"—	उ. ना.	उ. ना.
१५]	परिवहन आणि दळणवळण [३१.३.८९]			
	१. एकूण रेल्वे मार्गाची लांबी	कि. मी.	२८७	५४३३
	२. रस्त्यांनी जोडलेली गांवे	संख्या	१३९८	उ. ना.
	३. एकूण रस्त्यांची लांबी [पृष्ठांकीत]	कि. मी.	१३०५३	१६९९२१
	४. राष्ट्रिय महामार्गाची लांबी	—"—	२७०	२९१६
	५. राज्य महामार्गाची लांबी	—"—	१७७२	३०७६१

१	२	३	४	५
	६. महत्वाच्या जिल्हा रस्त्यांची लांबी	कि.मी.	२१२१	३७७९८
	७. इतर जिल्हा रस्त्यांची लांबी	—"—	२८३५	३७३५१
	८. ग्रामीण रस्त्यांची लांबी	—"—	४३४२	६१०९५
१६]	पिण्याच्या पाण्याचा पुरवठा कठीण गावांची संख्या [१९८७-८८]	संख्या	८२७	६०१३
	१. खेड्यांना केलेला पुरवठा	संख्या	५४०	उ.ना.
	अ] नळाचा पाणी पुरवठा	—"—	१७७	उ.ना.
	ब] कूपनलिका	—"—	२८७	उ.ना.
	क] विहिर	—"—	७६	उ.ना.
	२. टँकर्स किंवा बैलगाडीने पाणीपुरवठा केली जाणारी गांवे	टँकर्स	१३३	उ.ना.
		बैलगाडी	२९	उ.ना.
	३. योजनेत समाविष्ट करावयाची गांवे	संख्या	७४	उ.ना.
१७]	घरबांधणी [१९८७-८८]			
	१] भूमीहीन कामगारांसाठी बांधलेल्या झोपड्या.	संख्या	९००	उ.ना.
१८]	एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम.			
	१. दारिद्र रेषेखालील कुटुंबे १९८२-८३	लाखांत	१.६१	४१
	२. १९८७-८८ मधील लाभार्थी..जूने	संख्या	२७३४	१०८७४९
	..नवे	—"—	८२३९	१२९३६९
१९]	रोजगार निर्मिती [१९८८-८९]			
	१. रोजगारहमी योजना..मनुष्य दिवस	कोटी	०.६२	८.१३
	२. राष्ट्रिय ग्रामीण रोजगार कार्यक्रम	—"—	०.१३	२.५९
	३. ग्रामीण भूमीहीन रोजगार कार्यक्रम	—"—	०.०८	२.५९
२०]	आदिवासी कल्याणकारी योजना [८८-८९]			
	अ] आदिवासीकरींता आश्रमशाळा	संख्या	७४	उ.ना.
२१]	मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना १९८८-८९.			
	१. मागासवर्गीयांसाठी वसतीगृहे शासकीय	संख्या	१०६	उ.ना.
	२. वसतीगृहात राहणारे विद्यार्थी	—"—	५८७१	उ.ना.
२२]	जिल्हा नियोजन [१९८८-८९]			
	१. वार्षिक योजनेतील मंजूर तरतूद	रू. कोटी	३५	२४३०
	२. अनुशेष भरून काढण्यासाठी तरतूद	—"—	४	४००
२३]	नागरी पुरवठा.			
	१. रास्त भावाची दुकाने [१९८८-८९]	संख्या	१३०५	३४५९६
	२. पुरविलेला एकूण साठा [१९८८-८९]	"०००"टन	४९५८	उ.ना.
	३. शासकीय गुदामे [३१.३.८९]	संख्या	१७	११२५
	४. साठवण्याची क्षमता	"०००"टन	उ.ना.	७२८

भाग - १

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

जिल्हा - नाशिक

१९८८-८९

आर्थिक समालोचन – नाशिक जिल्हा.

संक्षिप्त ओळख.

नाशिक जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५५३० चौ. कि. मी. असून राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी ५.०४ टक्के क्षेत्र व्यापलेल्या या जिल्ह्याचा राज्याच्या एकूण क्षेत्रफळाशी विचार करता ५ वा क्रमांक आहे. १९८१ च्या जनगणनेनुसार राज्याच्या ४.७६ प्रतिशत असलेल्या व २९.९२ लाख लोकसंख्या असलेल्या ह्या जिल्ह्याचा लोकसंख्येबाबत राज्यात ४था क्रमांक आहे. राज्याच्या दर चौ. कि. मी. ला २०४ लोकसंख्या घनतेत जिल्ह्याची दर चौ. कि. मी. ला लोकसंख्या घनता १९३ असून राज्यात ११वा क्रमांक आहे. जिल्ह्यातील एकूण १७४६ खेडी, १३ तालुक्यातील सामुहिक विकास गटात समाविष्ट झालेली आहेत. १ महानगर पालिका, १ कटक मंडळ व ९ नगरपरिषदा या नागरी क्षेत्रात एकूण ९.२८ लाख लोकसंख्या असून एकूण लोकसंख्येच्या ३१ टक्के आहे.

नाशिक जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे विषम स्वरूपाचे असून वार्षिक सरासरी पर्जन्यमान १०३४ मि. मी. आहे. जिल्ह्यातील जमीन काळी, माळ, कोरळ व वरड या चार प्रकारात विभागलेली आहे. भूपृष्ठापासून भूगर्भातील पाण्याची सरासरी पातळी ५ ते ५५ फुटापर्यंत आहे.

जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ६९ टक्के व्यक्ती ग्रामीण भागात राहतात. एकूण लोकसंख्येच्या २३.४५ टक्के अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेला हा जिल्हा राज्यात ३-या क्रमांकावर आहे. एकूण लोकसंख्येचे साक्षरतेचे प्रमाण ४४.३६ टक्के असून साक्षरतेत राज्यात जिल्ह्याचा १५वा क्रमांक आहे.

१९८७-८८ या वर्षात जिल्ह्यात ९०७२०० हेक्टर जमिन लागवडीखाली आणण्यात आली व ती जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ५८.०३ प्रतिशत होती. एकूण ९०७०५६ हेक्टर पिकाखालील क्षेत्रापैकी ९६.११ प्रतिशत जमीन ही निव्वळ पिकाखालील क्षेत्र असून दुबार पिक हे निव्वळ पिकाखालील क्षेत्राच्या ४.०४ प्रतिशत होते. एकंदर पिकाखालील क्षेत्रापैकी ७६७७१३ हेक्टर जमीन ही खाद्य पिकाखालील होती. ती एकूण पिकाखालील क्षेत्राच्या ८४.६३ प्रतिशत होती. अखाद्य पिकाखालील १३९३४३ हेक्टर क्षेत्र हे एकूण पिकाखालील क्षेत्राच्या १५.३६ प्रतिशत होते.

जिल्ह्यात १९८७-८८ या वर्षी ओलिताखालील एकूण क्षेत्र १५३४१८ हेक्टर होते. ओलिताखालील क्षेत्रापैकी ५५०६२ हेक्टर क्षेत्र पृष्ठभागीय ओलित असून ७६५५८ हेक्टर क्षेत्र हे विहिरीखालील ओलित क्षेत्र होते.

नाशिक जिल्ह्यात एकलहरे येथे औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्प असून त्यातून उत्पादीत वीज महाराष्ट्र तसेच इतर राज्यात पुरविली जाते. जिल्ह्यातील एकूण १७४६ खेड्यांपैकी १७४२ खेड्यांचे व जिल्ह्यातील सर्व १९ नागरी भागाचे विद्युतीकरण

झालेले आहे. संदर्भ वर्षाति जिल्ह्यात राष्ट्रिय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा व गांव रस्ते असे एकूण १३०५३ कि.मी. लांबीचे रस्ते अस्तित्वात होते. जिल्ह्यातून मुंबई-धुळे-आग्रा व पुणे-नाशिक हे दोन राष्ट्रिय महामार्ग जात असून या दोन मार्गामुळे नाशिक शहर निरनिराळ्या राज्यातील शहरांशी जोडले गेले आहे. जिल्ह्यात असलेल्या राज्य महामार्गामुळे जिल्ह्यातील महत्त्वाची शहरे व तालुक्याची ठिकाणे जोडली गेली आहेत.

जिल्ह्यात २८७ कि.मी. लोहमार्गाचे जाळे असून जिल्ह्यातील इगतपूरी, नाशिक, निफाड, नांदगांव व येवला या तालुक्यातून हा लोहमार्ग गेलेला आहे. या लोहमार्गावर मनमाड हे रेल्वेचे जंक्शन स्थानक आहे. येथून दक्षिण भारतात रेल्वेचा एक मार्ग गेलेला आहे.

१९८९ अखेर जिल्ह्यात ४२८९ सहकारी संस्था कार्यरत होत्या. या सहकारी संस्थांची सभासद संख्या १०.९३ लाख होती. प्राथमिक कृषि सहकारी संस्थामार्फत ३०.६.८९ अखेर जिल्ह्यातील सभासद शेतक-यांना ८१९५ लाख रुपयांचे पिक कर्जाचे वितरण करण्यात आले होते.

जिल्ह्यात ३१ डिसेंबर १९८८ अखेर नोंदणीकृत कारखान्यांची संख्या १०७५ होती. त्यापैकी ९२७ कारखाने कार्यरत होते. या कारखान्यांत २६९६३ कामगार काम करीत होते. या कारखान्यांत महिंद्र अँड महिंद्र, मायको, गरवारे, क्रॉम्प्टन व व्हिआयपी इत्यादी मोठमोठ्या उद्योगसमुहांचा समावेश आहे.

राज्य सरकार, स्थानिकसंस्था व इतर सेवाभावी संस्था व खाजगी दवाखाने याव्दारे जिल्ह्यात आरोग्यसेवा उपलब्ध आहे. जिल्ह्यात ४१ रुग्णालये, ९३ दवाखाने व जिल्हा परिषदेची ९५ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत असून संदर्भ वर्षात १.७९ लाख आंतररुग्णांवर व २३.०३ लाख बाह्य रुग्णांवर उपचार करण्यात आले.

जिल्ह्यात शैक्षणीक सुविधा उपलब्ध असून जिल्ह्यात ३०.९.८७ अखेर प्राथमिक शाळा २८७०, दुय्यम शिक्षणाच्या शाळा ३७४ व उच्च शिक्षण शाळा २३ होत्या. सर्व शाळा व विद्यालयातून ७७६५४९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. तसेच जिल्ह्यात १ अभियांत्रिकी महाविद्यालय तर ४ तंत्रनिकेतन व ८ औद्योगीक प्रशिक्षण संस्था व एक आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय आहे. संदर्भ वर्षात कै.यशवंतराव चव्हाण "मुक्त विद्यापिठास" मंजूरी प्राप्तो झाली.

==========

जिल्हा - नाशिक

जिल्हा इतिहास

नाशिक प्रदेशाच्या अस्तित्वाचा उल्लेख पुरातन काळातील पाषाण युगापर्यंत जातो. तसेच संबंध पौराणिक उल्लेखानुसार थेट रामायण काळाशी येतो. प्रभू रामचंद्रांचे मुख्यत्वे वनवासातील १२ वर्षाचे पुनित वास्तव्य नाशिक परिसरांत गोदावरीचे काठी पंचवटीत होते.

जिल्ह्याचे मुख्यालय असलेले नाशिक शहर हे प्राचीन काळापासून तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे. जिल्ह्यातील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर आणि सप्तश्रृंगी गड हे तर भावीकांचे श्रध्दास्थाने आहेत.

सध्याच्या नाशिक जिल्ह्याचा बहुतांश भाग इ.स. १३१३ ते १३४७ या कालांत देवगीरीच्या यादवांच्या अधिपत्याखाली व त्यानंतर १४९० पर्यंत बहामनी राज्याचा एक भाग होता. इ.स. १४९० ते १६३६ या कालांत तो अहमदनगरच्या निझामशाहीत समाविष्ट झाला होता. छत्रपती श्री. शिवाजी महाराजांनी मुस्लिम सत्तेच्या जोखडा तून हा भाग मुक्त केला. पेशवाईच्या अस्तानंतर इ.स. १८१८ पासून हा सर्व भूभाग ब्रिटीशांचे अधिपत्याखाली गेला.

मध्ययुगात प्रशासकीयदृष्ट्या नाशिक जिल्ह्याचा काही भाग अहमदनगर व काही भाग खानदेश जिल्ह्यांत होता. १८६९ मध्ये नाशिक हा स्वतंत्र जिल्हा करण्यांत आला. तेंव्हापासून १३ तालुके असलेल्या या जिल्ह्याच्या हद्दीत लक्षणीय असे बदल झालेले नाहीत.

१९५६ मधील राज्य पुर्न:रचनेत मुंबई राज्यात समाविष्ट असलेला हा जिल्हा १९६० मध्येही महाराष्ट्र राज्याचा एक जिल्हा म्हणून "मुंबई महसूल विभागातच"होता. २०.२.१९८१ पासून नाशिक, धुळे, जळगांव व अहमदनगर हे चार जिल्हे असलेला स्वतंत्र नाशिक महसूल विभाग अस्तित्वांत आला.

पौराणिक ऐतिहासीक व सांस्कृतीक परंपरेची संपन्नता लाभलेला नाशिक जिल्हा आता औद्योगीक क्षेत्रातही विकासाकडे यशस्वी वाटचाल करीत आहे.

[१] स्थान व नैसर्गिक वैशिष्ट्ये.

१.१ स्थान-तीन: तापी नदीच्या खो-यांत अंशत: व उर्ध्व गोदावरी नदीच्या खो-यांत अंशत: वसलेल्या समलंब चौकोनाकार नाशिक जिल्ह्याचे १९.३३ व २४.५३ उत्तर अक्षांश आणि ७३.१६ व ७५.१६ पूर्व रेखांश याप्रमाणे भौगोलिक स्थान आहे.

नाशिक जिल्ह्याचे उत्तरेस धुळे जिल्हा, पुर्व व ईशान्य दिशेला जळगांव जिल्हा, अग्नेय दिशेला औरंगाबाद जिल्हा आहे, अहमदनगर जिल्हा दक्षिणेत तर पश्चिम व

नैऋत्य दिशेस ठाणे जिल्हा असून डांग व सुरत हे गुजराथ राज्यातील जिल्हे वायव्य दिशेस याप्रमाणे नाशिक जिल्ह्याच्या सीमा आहेत.

१.२ क्षेत्रफळ व प्रशासकीय संरचना: नाशिक जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५५३० चौ. कि.मी. असून राज्यात क्षेत्रफळाच्या बाबतीत या जिल्ह्याचा तिसरा क्रमांक लागतो. राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ५.०४ प्रतिशत क्षेत्र या जिल्ह्याने व्यापलेले आहे. नाशिक जिल्हा हा पूर्वी "मुंबई महसूल" विभागाचा एक भाग होता. फेब्रुवारी-१९८१ पासून नाशिक हा स्वतंत्र महसूल विभाग स्थापन करण्यात आला व त्यात पूर्वीच्या मुंबई विभागातील नाशिक, धुळे, जळगांव हे जिल्हे आणि पूर्वी पुणे महसूल विभागात असलेला अहमदनगर जिल्हा अशा चार जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला. प्रशासकीय कारणासाठी नाशिक जिल्ह्याच्या १३ तालुक्यांची पुढील प्रमाणे तीन उपविभागांत विभागणी करण्यात आली. १]नाशिक-नाशिक, पेठ, दिंडोरी, इगतपूरी, कळवण व सुरगाणा तालुके २]निफाड-निफाड, सिन्नर, चांदवड व येवला ३] मालेगांव-मालेगांव, नांदगांव व बागलाण तालुके.

१९८१ जनगणनेनुसार नाशिक जिल्ह्यात एकूण १७४६ खेडी असून त्यापैकी ४खेडी ओसाड आहेत. तहसिलनिहाय खेड्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. १] नाशिक-१२९ २] दिंडोरी-१३२ ३] पेठ-१५४ ४] सुरगाणा-१६६ ५] कळवण-१६० ६] बागलाण-१६४ ७] मालेगांव-१४७ ८] चांदवड-१०५ ९] नांदगांव-८ १०] येवला-१२२ ११]निफाड-१२९ १२] सिन्नर-१०३ व १३] इगतपूरी-१२५. जिल्हा परिषद व तिच्या अधिपत्याखालील १३ पंचायत समित्यांमार्फत ग्रामीण विभागातील कामे केली जातात, तर नागरी भागा-मधील विविध प्रशासकीय व लोकोपयोगी कामे महानगरपालिका व नगर परिषदा मार्फत केली जातात.

७ नोव्हेंबर-१९८२ पासून नाशिक महानगरपालिका स्थापन झाली, देवळाली कॅम्प क्षेत्र कटक मंडळाखाली येते, याशिवाय १] मालेगांव [अ-वर्ग], मनमाड-[ब-वर्ग] आणि नांदगांव, सिन्नर, येवला, सटाणा, इगतपूरी, त्र्यंबक आणि भगूर [सर्व क-वर्ग] या प्रमाणे ९ नगरपरिषदा आहेत. १९८७-८८ अखेर नाशिक जिल्हा परिषदेच्या अधिपत्या-खालील १३ पंचायत समित्यांमध्ये १२४७ ग्राम पंचायती होत्या.

१.३ नैसर्गिक वैशिष्ट्ये: जिल्ह्याचा काही भाग गिरणा तर काही भाग गोदावरी नदीच्या खो-यांनी व्यापलेला आहे. नांदगांव, कळवण, बागलाण या तालुक्यांचा उत्तर व ईशान्य भाग गिरणा व तिच्या उपनद्यांनी व्यापलेला आहे तर नाशिक व निफाड हे तहसिल गोदावरी व तिच्या उपनद्यांच्या परिसरात वसलेले आहेत. जिल्ह्याचा उर्वरीत भाग वैतरणा, दारणा व मन्याड नद्यांच्या खो-यात वसलेला आहे.

उत्तरेकडुन दक्षिणेकडे जाणा-या सह्याद्री पर्वताच्या रांगांनी जिल्ह्याचा पश्चिम भाग व्यापला असून इगतपूरी, पेठ व सुरगाणा हे तालुके पुर्णत: आणि कळवण, नाशिक व

बागलाण या तालुक्यांचा पश्चिम भाग त्यांत समाविष्ट आहे. सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडील सेलबारी या टेकडीने नाशिक व धुळे या जिल्ह्यांची सरहद्द निश्चित केलेली आहे.

१.४ भूगर्भ व खनिज पदार्थ: आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे असे कोणतेच खनिज जिल्ह्यांत सापडत नाही. फक्त चुनखडी व कंकर जिल्ह्यात सर्वत्र सापडते. जिल्ह्यात उपलब्ध असलेले "ट्रॅप रॉक्स" हे इमारतीच्या बांधकामासाठी उपयोगी पडतात.

१.५ नद्या: गोदावरी व गिरणा या नाशिक जिल्ह्याच्या मुख्य दोन नद्या असून त्या व्यतिरिक्त वैतरणा, मोसम, दारणा, मन्याड आणि कादवा या महत्त्वाच्या नद्या आहेत. जिल्ह्यातून गोदावरी नदीची लांबी १११ कि.मी. असून ती नाशिक व निफाड तालुक्यातून वाहते. गिरणा नदीची लांबी १४४ कि.मी. असून तो सुरगाणा, कळवण, बागलाण, मालेगांव व नांदगांव या तालुक्यातून वाहते. वैतरणा ही नदी इगतपुरी तालुक्यातून वाहत असून तीची लांबी ४० कि.मी. आहे. ८० कि.मी. लांबीची दारणा नदी इगतपुरी, नाशिक व निफाड या तालुक्यातून वाहते. कादवा व मन्याड या नद्यांची लांबी अनुक्रमे ७४ व ७८ कि.मी. असून त्या अनुक्रमे दिंडोरी व नांदगांव या तालुक्यातून वाहतात.

१.६ हवामान व पाऊस: जिल्ह्याचे हवामान तिन ऋतूंचे असून [१] जून उत्तरार्ध ते सप्टेंबर - पावसाळा [२] आक्टोबर ते मार्चच्या मध्यापर्यंत - हिवाळा व [३] मार्च मध्य ते जून पूर्वार्ध पर्यंत उन्हाळा असतो. उन्हाळ्यांत हवामान सामान्यत: उष्ण असून तपमान ३८ ते ४३ सेल्सिअस पर्यंत असते. जिल्ह्यात जून ते आक्टोबर या काळांत नैऋत्य मौसमी वा-यांपासून चुरेसा पाऊस पडतो. नाशिक जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान १०३४ मि.मी. आहे परंतू पावसाचे हे प्रमाण जिल्ह्यात सर्वत्र सारखे आढळत नाही. जिल्ह्याच्या पश्चिमेकडे असलेल्या सह्याद्रीच्या घाटातील सुरगाणा, पेठ व इगतपुरी या तहसिलमध्ये पाऊस खूपच पडतो, या भागात सर्वसाधारण १६०० ते २९७७ मि.मी. पाऊस पडतो. जिल्ह्याचे १९८८ चे सरासरी पर्जन्यमान १०३४ मी.मी. होते.

१.७ जमीन: जिल्ह्यातील जमीनीचे साधारणत: १] काळी २] तांबडी [माळ], ३] तांबडी-काळी [कोरळ] व ४] मंद करडी [चरड] असे चार प्रकार आहेत. काळी जमीन गिरणा व मोसमच्या नद्यांच्या खो-यात सापडते तर तांबडी जमीन जिल्ह्याच्या डोंगर उतरणीवर सापडते. तांबडकाळी जमीन डोंगराळ भागात आढळते तर पठारावर मंदकरडी. तांबडी व मध्यम काळी जमीन नाशिक, कळवण व बागलाण तालुक्यांत आढळते तर मध्यम काळी जमीन मालेगांव, चांदवड, नांदगांव, येवला, निफाड व सिन्नर तालुक्यात दिसून येते. इगतपुरी तालुक्यांत तांबडी जमीन, पेठ तालुक्यात पिवळसर व दिंडोरी तालुक्यांत तांबडी व काळी जमीन आढळते. सुरगाणा तालुक्यांत मंद करड्या रंगाची जमीन प्रामुख्याने आढळते.

१.८ भूजल: जिल्ह्याच्या भूगर्भातील पाण्याची सरासरी पातळी साधारणत: ४ते५५ फुट अंतरावर आढळते. नद्यीच्या खो-यातील तालुक्यात पाण्याची पातळी ४ते४५ फूट अंतरावर आहे, तर डोंगराळ भागात ती ५ ते ६५ फुट अंतरावर आढळते.

[२] लोकसंख्या.

२.१ जनगणना आणि वार्षिक प्रक्षेपित आकडेवारी: १९८१ जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २९,९१,७३९ असून त्यापैकी १५,४४,५३२ पुरुष व १४,४७,२०७ स्त्रिया आहेत. १९८८ च्या अनुमानित लोकसंख्येशी तुलना करता सरळपणे वार्षिक वृध्दिचा दर २.२ टक्के आहे. एकूण लोकसंख्येपैकी जिल्ह्यात नाशिक तालुक्याची लोकसंख्या २०.९६ टक्के सर्वाधिक असून सुरगाणा तालुक्याची लोकसंख्या २.७४ टक्के सर्वात कमी आहे.

जिल्ह्याची एकूण लोकसंख्या, दशवर्षीय बदल, स्त्री-पुरुष प्रमाण, साक्षरता, ग्रामीण व नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी.

वर्ष	एकूण लोकसंख्या	लोकसंख्येतील दशवर्षीय बदल [टक्केवारी]	दरएकहजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या	साक्षरता प्रमाण - टक्केवारी	ग्रामीण लोकसंख्या प्रमाण. टक्केवारी	नागरी लोकसंख्या प्रमाण. टक्केवारी
१	२	३	४	५	६	७.
१९०१	८,२३,०८०	-	९७४	४.३१	८८.२६	११.७४
१९११	९,१५,६९८	∓ ११.२५	९८४	४.३७	८९.१४	१०.८६
१९२१	८,४५,७८३	- ७.६४	९६०	६.३६	८३.९४	१६.०६
१९३१	१०,०९,५८३	∓ १९.३७	९६३	७.८९	८५.६५	१४.३५
१९४१	११,२७,५९७	∓ ११.६९	९५३	१५.५७	८४.४०	१५.६०
१९५१	१४,२९,९१६	∓ २६.८१	९५६	२१.४०	७४.१३	२५.८७
१९६१	१८,५५,२४६	∓ २९.७५	९४६	२६.८९	७४.४०	२५.६०
१९७१	२३,६९,२२१	∓ २७.७०	९४०	३६.३०	७१.३६	२८.६४
१९८१	२९,९१,७३९	∓ २६.२८	९३७	४४.३६	६८.९८	३१.०२

२.२ लोकसंख्येची घनता: जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता प्रति चौ.कि.मी.ला १९३ व्यक्ती असून राज्याची घनता २०४ आहे. जिल्ह्यात नाशिक तालुक्याची लोकसंख्या घनता सर्वाधिक म्हणजेच प्रति चौ.कि.मी.ला ४९५ आहे, तर सर्वात कमी सुरगाणा तालुक्यात प्रति चौ.कि.मी.ला ९९ इतकी आहे. तालुकावार लोकसंख्येची घनता तक्ता क्रमांक १.१ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

ग्रामीण, नागरी लोकसंख्या: १९८१ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्याच्या एकूण २९.९२ लाख लोकसंख्येपैकी शेकडा ६८.९८ टक्के लोक ग्रामीण भागात व उर्वरीत ३१.०२ टक्के लोक नागरी भागात राहतात. जिल्ह्यातील एकूण ९.२८ लाख नागरी लोकसंख्ये पैकी ७७ टक्के लोकसंख्या नाशिक महानगरपालिका व मालेगांव नगर परिषद या शहरी क्षेत्रात एकवटली आहे.

२.३ स्त्री-पुरुष प्रमाण: १९८१ च्या जनगणनेनुसार नाशिक जिल्ह्यात एकहजार पुरुषां मागे स्त्रियांची संख्या ९३७ असून जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी भागातील प्रमाण अनुक्रमे ९५९ व ८८९ स्त्रिया असे आहे.

२.४ अनुसूचित जाती व जमाती: जिल्ह्याच्या एकूण २९.९२ लाख लोकसंख्येपैकी ६.२१ टक्के लोकसंख्या अनुसूचित जातीची असून २३.४५ टक्के लोकसंख्या अनुसूचित जमातीची आहे. जिल्ह्यात नाशिक व कळवण असे २ आदिवासी विकास प्रकल्प असून त्यातील तालुकानिहाय आदिवासी लोकसंख्या व क्षेत्रफळाबाबत माहिती खालील तक्त्यात दिलेली आहे.

आदिवासी प्रकल्प.

अ.क्र.	प्रकल्पाचे नांव	त्यातील समाविष्ट तालुके	एकूण खेडी	क्षेत्रफळ चौरस कि.मी.	१९८१ जनगणने प्रमाणे आदिवासी लोकसंख्या
१	२	३	४	५	६.
१]	नाशिक	१] पेठ	१५४	९३४	९२७०७
		२] दिंडोरी	१०६	११६४	६७९४६
		३] इगतपूरी	९३	६९७	५२१९८
		४] नाशिक	७१	७५१	३८४९३
२]	कळवण	१] कळवण	१६०	११९५	७७१७९
		२] सुरगाणा	१६६	८२८	७६०२४
		३] बागलाण	६०	५६५	३५४३०

२.५ काम करणा-यांची संख्या: १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील २९.९२ लाख लोकसंख्येपैकी १२.२० लाख [४०.७७ टक्के] मुख्यत: काम करणारे व ०.९४ लाख [३.१५ टक्के] सिमांतीक काम करणारे आहेत.

१२.२० लाख मुख्यत: काम करणा-या व्यक्तींपैकी शेतकरी ४२.२१ टक्के तर शेतमजूर २६.५५ टक्के आहेत. १.९३ टक्के लोक घरगूती उद्योग, वस्तू निर्माण प्रक्रीया सेवा-दुरुस्ती या व्यवसायांत तर २९.३१ टक्के व्यक्ती बांधकाम, व्यापार व वाहतूक, दळणवळण व इतर व्यवसायांत गुंतलेली आहेत.

२.६ वयोगटानुसार लोकसंख्या: १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याच्या २९.९२ लाख लोकसंख्येपैकी ० ते १४ वर्षे वयोगटांत ३९.८७ टक्के, १५ ते २९ वर्षे वयोगटांत २५.७५ टक्के, ३० ते ४९ वयोगटांत २२.१२ टक्के, ५० ते ५९ वर्षे वयोगटांत ६.१८ टक्के व ६० व त्याहून अधिक वयोगटांत ६.७२ टक्के लोक आहेत.

२.७ साक्षरता: १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण ४५.३६ टक्के तर राज्यातील साक्षरता प्रमाण ४७.१८ टक्के आहे. एकूण १३.२७ लाख साक्षर लोकसंख्ये पैकी ७.५६ लाख [५६.९७ टक्के] व्यक्ती ग्रामीण भागात व ५.७१ लाख [४३.०३ टक्के]

व्यक्ती नागरी भागात आहेत. जिल्ह्यात नाशिक तालुका साक्षरतेत प्रथम [५८.४५ टक्के] असून सर्वात कमी साक्षरतेचे प्रमाण सुरगाणा तालुक्यात [१६.४७ टक्के] आहे.

२.८ निवास, घरे व कुटुंबे: १९८१ च्या जनगणनेनुसार या जिल्ह्यातील निवासी घरांची संख्या ४९४३०३ असून त्यापैकी ३४१२२६ [६९.०३ टक्के] घरे ही ग्रामीण भागात होती. तसेच जिल्ह्यातील एकूण ५०९६५४ कुटुंबापैकी ३५०६२२ [६८.७९ टक्के] कुटुंबे ग्रामीण भागात रहात होती.

[३] वने.

३.१ वनक्षेत्र: १९८८-८९ च्या महसूल अभिलेखाप्रमाणे ३१३४८४७ हेक्टर जंगलव्याप्त क्षेत्र होते. वनखात्याच्या अखत्यारीत ३१३४८४ हेक्टर क्षेत्र होते.

३.२ सामाजिक वनिकरण विभागाने रस्त्याच्या कडेला पंचायतीच्या व खाजगी जमीनीत लागवड करून हे क्षेत्र वाढविण्यास मदत केली आहे.

३.३ वनोत्पादने: १९८८-८९ या वर्षात इमारती लाकूड, सरपण, गवत, बांबू आणि वन उत्पादन विक्रीपासून १६०.०४ लाख रुपये उत्पन्न मिळाले.

[४] कृषि विभाग.

४.१ जमीनीचे वापरानुसार वर्गीकरण: जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १५६३००हेक्टर हे जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयाच्या दप्तरान्वये असून त्याचा १९८७-८८ या वर्षातील वापर खालील प्रमाणे होता.

अ.क्र.:	बाब	क्षेत्र "००" हेक्टर	टक्केवारी.
१.	जंगलव्याप्त क्षेत्र	३३९१	२१.६९
२.	शेतीला लागवड नसलेले क्षेत्र	१०१९	६.५१
३.	लागवड न केलेले इतर क्षेत्र	१२५६	८.०३
४.	एकूण चालू + इतर पड	१२४८	७.९८
५.	पिकाखालील निव्वळ क्षेत्र	८७१९	५५.७९

४.२ निव्वळ व दुबार पिकाचे क्षेत्र: १९८७-८८ मध्ये जिल्ह्यातील तालुकावार निव्वळ पिकाखालील क्षेत्र, लागवडीखालील क्षेत्राची टक्केवारी, दुसोटा, तिसोटा खालील क्षेत्राची निव्वळ पिकाखालील क्षेत्राशी प्रतिशत आकडेवारी खालील प्रमाणे होती.

अ.क्र.:	तालुका	:निव्वळ पिकाखालील: क्षेत्र [हेक्टरमध्ये]	:एकूण लागवडीखालील: क्षेत्राची टक्केवारी	:दुसोटा, तिसोटा क्षेत्राची :निव्वळ पिकाखालील :क्षेत्राशी टक्केवारी.
१	२	३	४	५.
१.	नाशिक	५७६०६	६७.५३	४.६४
२.	पेठ	३२२७६	७५.५८	-
३.	दिंडोरी	७७१६१	८०.४५	६.६०
४.	सुरगाणा	३५३८८	९१.६७	०.२४
५.	कळवण	५८८३५	८६.१४	३.७५
६.	बागलाण	८३६१२	७३.८६	४.२१

१	२	३	४	५
७.	मालेगांव	११३३४१	७७.१०	१.८८
८.	चांदवड	६५५०५	९०.९७	१.८२
९.	नांदगांव	५१२८१	८९.५२	३.०७
१०.	येवला	७८१८८	८९.२५	४.१७
११.	निफाड	६७७६०	८९.१५	१३.२७
१२.	सिन्नर	८८२७३	७७.७६	२.३६
१३.	इगतपुरी	५३८६२	८३.७६	३.८६

जिल्ह्यात ९.०७ लाख हेक्टर जमीन पिकाखाली होती तर निव्वळ पिकाखालील क्षेत्र ८.७१ लाख हेक्टर होते ते एकूण पिकाखालील क्षेत्राच्या ९६.०३ टक्के आहे. दुबार पिकाखालील क्षेत्र ०.३५ लाख हेक्टर होते ते निव्वळ पिकाखालील क्षेत्राच्या ४.०१ टक्के होते.

४.३ <u>जमीन धारणा</u>: १९८०-८१ च्या कृषि गणनेनुसार जिल्ह्यात एकूण २,९०,५०२ वहित खातेदार असून त्यांनी वहिताखाली आपलेली जमीन १०५०८६१ हेक्टर असून त्या पैकी ४०.६० टक्के खातेदार हे २ हेक्टर पर्यंत जमीन असलेले खातेदार होते व त्यांनी धारण केलेले क्षेत्र ११.२५ टक्के होते. २ ते ५ हेक्टर पर्यंत जमीन असलेल्या खातेदारांची टक्केवारी ३६.३७ टक्के असून त्यांनी धारण केलेल्या क्षेत्राची टक्केवारी ३३.२८ टक्के होती. ५ ते १० हेक्टर जमीन असलेल्या खातेदारांची टक्केवारी १७.३२ टक्के असून त्यांनी धारण केलेल्या क्षेत्राची टक्केवारी ३२.७१ टक्के होती. १० ते २० हेक्टर जमीन असलेल्या खातेदारांची टक्केवारी ५.०४ टक्के असून त्याचे धारण केलेले क्षेत्र १७.८१ टक्के होते. २० ते ५० हेक्टर जमीन असलेल्या खातेदारांची टक्केवारी ०.६४ टक्के असून त्यांचे धारण क्षेत्र ४.३३ टक्के होते. ५० किंवा त्यापेक्षा जास्त जमीन असलेल्या खातेदारांची टक्केवारी ०.०२ टक्के असून त्यांचे धारण क्षेत्र ०.६० टक्के होते.

४.४ <u>पिकांची वर्गवारी व त्यांची व्याप्ती</u>: जिल्ह्यातील मुख्य खरीप पिके बाजरी, ज्वारी, तांदूळ व उडीद असून गहू व हरभरा ही प्रमुख रब्बी पिके आहेत. जिल्ह्यात लागवडीखाली असलेल्या सर्व पिकांच्या क्षेत्रापैकी बाजरी व ज्वारी या दोन पिकांखालील क्षेत्र सर्वात जास्त दिसून येते. सन-१९८७-८८ या वर्षात ते अनुक्रमे ४५.०८ व ७.३१ टक्के होते. त्यानंतर तांदूळ व गहू यांचे प्रमाण अनुक्रमे ५.०७ व ३.७५ टक्के दिसून येते. तसेच गळीत पिकांपैकी भुईमूगाचे प्रमाण ४.९० टक्के आणि डाळे व पालेभाज्यांचे प्रमाण ३.६६ टक्के होते.

गवत हे जनावरांच्या चारा-याचे पिक असून त्याखाली सन-१९८७-८८ मध्ये ७.४१ टक्के क्षेत्र होते तर गेल्यावर्षी हेच क्षेत्र ९.३१ टक्के होते.

जिल्ह्यातील गव्हाच्या पिकाखालील क्षेत्र विचारांत घेता १९८७-८८ मध्ये <u>दिंडोरी तालुक्यात गव्हाखालील क्षेत्र सर्वात जास्त असून [२२.८३ टक्के] त्याचा जिल्ह्यात</u>
[illegible] त्याचा [नऊ] [२०.६१ [illegible]] तर [illegible] [२०-२३[illegible]]/-
[illegible] बाजरी पिकाचे [illegible] मात्र मालेगांव
ता

प्रथम क्रमांक लागतो, तर त्याखाली निफाड [२०.६१%] तर नाशिक [१०.९२ टक्के] यांचा अनुक्रमे दूसरा व तिसरा क्रमांक लागतो. बाजरी पिकाचे बाबतीत मात्र मालेगांव तालुक्याचा [१९.३०%] पहिला क्रमांक असून त्याखालोखाल सिन्नर व येवला यांचा [१५.१४ व १४.३९ टक्के] अनुक्रमे दूसरा व तिसरा क्रमांक लागतो. दिंडोरी तालुक्यात मात्र ज्वारी खालील क्षेत्राचे प्रमाण जास्त असून येवला तालुका दूस-या क्रमांकावर आहे. तेल बियांचे बाबतीत मालेगांव, दिंडोरी तालुक्यात जास्त क्षेत्र असून ऊसाखालील क्षेत्र निफाड व बागलाण या तालुक्यात विशेषत्वाने दिसून येते.

फळे व भाजीपाला: नाशिक जिल्ह्यात मुख्यत्वे करून कोची, टमाटे, फ्लावर ह्या भाज्यांचे उत्पादन व कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात असून सदरील भाजीपाला जिल्ह्यातून मुंबई, सुरत, वलसाड व अहमदाबाद येथे निर्यात केला जातो, तर कांदे कलकत्त्यासही पाठविले जातात. एकूण भाजीपाल्याखालील ८७-८८ चे क्षेत्र २३७३५ हे असून यापैकी नाशिक, दिंडोरी, निफाड हे प्रामुख्याने भाजीपाला पिकवणारी तालुके आहेत.

फळे: नाशिक जिल्हा द्राक्षांकरीता प्रसिध्द असून सर्व फळाखालील क्षेत्र ९५३७ हे ८७-८८ करीता असून द्राक्षाखालील सुमारे ४२०३ क्षेत्र असून नाशिक, निफाड, सिन्नर, चांदवड व दिंडोरी हे पांच तालुके द्राक्ष उत्पादनांत आघाडीवर आहेत. तद्वतच जिल्ह्यात पेरूचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर असून नाशिक जिल्ह्यात सिन्नर व नाशिक ह्या तालुक्यातील पेरू प्रसिध्द आहेत.

४.५ मुख्य पिकांचे एकूण उत्पादन व प्रतिहेक्टरी उत्पन्न: सन-१९८६-८७ च्या तुलनेत १९८७-८८ मध्ये बहूतेक सर्व प्रमुख पिकांच्या प्रतिहेक्टरी उत्पादनांत वाढ झाली होती.

४.६ रासायनिक खतांचा वापर: १९८८-८९ मध्ये जिल्ह्यात ५२५२२ टन रासायनिक खतांचे वाटप करण्यात आले हे सन-१९८७-८८ च्या तुलनेत रासायनिक खतांचे वाटपात अनपेक्षित परिस्थितीमुळे घट झाल्याचे दिसून येते. रासायनिक खतांमध्ये युरिया व मिश्रखते या खतांचा प्रामुख्याने उपयोग करण्यांत येत असल्याचे दिसून येते.

४.७ पिक संरक्षक उपाय: जिल्ह्यात पिकांवर संरक्षणाचा उपाय म्हणून पिकांवरील औषध फवारणी व भुकटी फवारणी या दोन उपायांचा समावेश आहे. १९८८-८९ मध्ये संकरीत ज्वारी, गहू, हरभरा, संकरीत बाजरी इत्यादी पिकांवर या फवारणीचा उपयोग करण्यांत आला. एकूण १००७४ हेक्टरवर फवारणी करण्यांत आली.

४.८ कृषि मालाची साठवण व विक्री: जिल्ह्यात एकूण १० कृषि उत्पन्न बाजार समित्या असून दोन ठिकाणी उप-समित्या आहेत. काही ठिकाणी शेतक-यांची निवासाची सोय करण्यांत आलेली आहे. तसेच जनावरांसाठी जागा, पिण्याच्या पाण्याची सोय व शेतक-यांच्या मालाची साठवण करण्याची व्यवस्थापण करण्यांत आली आहे.

१९८९ मध्ये या बाजार समित्यांमध्ये ४१२१ टन हरभरा, ३६१६० टन गहू, ३७२२९ टन बाजरी व १४५०६ टन ज्वारी इत्यादी पिकांची आवक झाली. १९८८ च्या तुलनेने गहू या पिकाची आवक वाढली व हरभरा, ज्वारी व बाजरी या पिकांची आवक कमी झाली.

भुईमूग व गुळ या नगदी पिकांच्या बाबतीत १९८९ मध्ये अनुक्रमे २५०७० टन व २८८७ टन आवक झाली, तर १९८८ साली ती आवक अनुक्रमे २३८२१ व ४७९८ टन एवढी होती. संदर्भ वर्षात भुईमूगाची आवक वाढली. कांदा हे व्हा जिल्ह्याचे प्रमुख पिक असून १९८८ च्या आवक ५१५२७४ टनाच्या तुलनेत १९८९ मध्ये ७०१५५३ टन अशी लक्षणीय वाढ झाली आहे.

जिल्ह्यात एकूण सरकारी मालकीची २७ व भाड्याने घेतलेली ४ अशी ३१ साठवण गृहे असून त्यांची साठवणाची क्षमता १९६६० मे.टन आहे. मनमाड येथे बाजार महामंडळाची साठवणगृहे आहेत.

महाराष्ट्र राज्य पणन संस्थांची जिल्ह्यात २८० साठवणगृहे असून त्यांची क्षमता ५४५३० मे.टन आहे. तर सहकारी संस्थांच्या मालकीची एकूण ५८७६० मे.टन क्षमतेची १६८ साठवणगृहे आहेत.

४.९ जमीन सुधारणा: १९८८-८९ या वर्षात ३७६९ हेक्टर क्षेत्रात जमीन समतल करण्यात आली तर ९७ हेक्टर कंटूर बंडींग करण्यात आले व नालाबंडींगची १५५ कामे पूर्ण करण्यात आली.

[५] जलसिंचन.

५.१ जलसिंचन साधने: १९८८-८७मधील ओलिताखाली निव्वळ क्षेत्र १३१६२० हेक्टर च्या तुलनेत १९८८-८७ या वर्षी १४५५३२ हेक्टर होते, म्हणजेच १९८७-८८ मध्ये ओलिता खालील क्षेत्रात घट झालेली दिसून येते. एकूण सिंचनाच्या अंदाजे ५८ टक्के सिंचन हे विहिरींपासून झालेले असून उर्वरीत पृष्ठभागीय सिंचनाव्दारे झालेले होते. १९८७-८८ या वर्षात निफाड तालुका हा सिंचनाच्या बाबतीत सर्वात अग्रेसर होता.

सन-१९८७-८८ मध्ये एकूण पिकाखालील क्षेत्राच्या १६.९१ टक्के क्षेत्र ओलिताखाली होते. ओलिताच्या एकूण क्षेत्रापैकी १२.९२ टक्के क्षेत्र गहू, ८.५५ टक्के क्षेत्र, भुईमूग, १३.७७ टक्के क्षेत्र, ऊस, ८.५५ टक्के क्षेत्र हरभरा हे प्रमुख पिकांनी व्यापले होते, तर फळे व भाजीपाला खालील १४.६६ टक्के क्षेत्र होते.

[६] पशु संवर्धन व पशु वैद्यकीय सेवा व दुग्ध व्यवसाय.

६.१ पशुधन गणना-१९८७: या गणनेप्रमाणे जिल्ह्याची एकंदर पशुधनाची संख्या १८१५१६९ होती. १९८२ मध्ये झालेल्या पशुधन गणनेनुसार ती १७२९२९९ इतकी होती. १९८७ च्या एकूण पशुधनापैकी बैल व गाई यांचे प्रमाण ४९.७८ टक्के इतके होते, तर

म्हशी व रेडे यांचे प्रमाण ८.९६ टक्के होते, मेंढ्या व मेंढ्या यांचे प्रमाण ४१.८२ टक्के होते तर इतर प्रकारच्या प्राण्यांचे प्रमाण ०.१४ टक्के होते. १९८७ पशुगणनेनुसार कोंबड्या व बदके यांची संख्या ११,८९,५३७ एवढी होती व १९८२ च्या तुलनेत १६.७८ टक्के एवढी वाढ दिसते.

६.२ सन-१९८२ च्या पशुधन गणनेच्या तुलनेत १९८७ च्या पशुधन गणनेतील पशुधनाची संख्या ४.७३ टक्क्यांनी वाढली होती. यात गायी व बैल यांच्या संख्येत १.०१ टक्क्यांनी वाढ झाली, तर म्हशी व रेडे यांच्या संख्येत ११.९० टक्क्यांनी वाढ झाली होती. तसेच बक-या व मेंढ्या यांच्या संख्येत १२.१८ टक्क्यांनी वाढ झालेली दिसून येते.

६.३ १९८८-८९ मध्ये जिल्ह्यातील मान्यताप्राप्त १८ कत्तलखान्यातून कत्तल केलेल्या जनावरांची संख्या ९७२८१ इतकी होती. त्यात बैल, म्हशी, रेडे, मेंढ्या व बक-या या जनावरांचा समावेश होता.

६.४ <u>पशुवैद्यकीय सेवा</u>: सन-१९८८-८९ या वर्षात जिल्ह्यात एकंदर १ पशु रुग्णालय, ४४ दवाखाने, ८४ पशुवैद्यकीय उपचार केंद्रे व १७८ कृत्रिम गर्भधारणा केंद्रे कार्यरत होती. १९८८-८९ या वर्षात ४२२०९ जनावरांना कृत्रिमरित्या गर्भधारणा करण्यात आली, या शिवाय वरील दवाखाने, रुग्णालये व मदतकेंद्रे यांत १९८८-८९ मध्ये एकूण ४८७४४५ जनावरांवर उपचार करण्यात आले.

६.५ <u>विकास कार्यक्रम</u>: जनावरांचा विकास करण्याच्या दृष्टिने सन-१९८८-८९ मध्ये पशुसंवर्धन विभागातर्फे सुधारलेल्या गायी पुरविणे, कृत्रिम गर्भधारणा करणे, जनावरांच्या आरोग्याची काळजी व जनावरांसाठी चारा उत्पादन इत्यादी कार्यक्रम हाती घेण्यात आले. गायींची निपज वांगली होण्यासाठी वांगल्या जातीच्या बैलांची जोपासना केली गेली. कृत्रिम गर्भधारणेसाठी निरनिराळ्या पशुवैद्यकीय मदतकेंद्रांना वांगले रेतन पुरविण्यात आले. तसेच २ संकरीत वासरांचे मेळावे व ४ कार्यशिबिरा शिबीरे घेण्यात आली.

६.६ <u>कुक्कुट पालन</u>: कुक्कुट पालन कार्यक्रमाखाली १९८८-८९ मध्ये १५४६ पक्ष्यांचे व ५३१३ एक दिवसांच्या पिलांचे वाटप करण्यात आले.

६.७ जिल्ह्यातील शासकीय दूध योजना नाशिक व धुळे यांच्यामार्फत दूधाची खरेदी व संकलन केले जाते. तसेच चांदवड येथे दूध शितकरण प्रकल्प आहे. सन-१९८८-८९ मध्ये जिल्ह्याला दूधापासून ४५८.६७ लाख रुपये उत्पन्न मिळाले.

[७] <u>मत्स्य व्यवसाय</u>.

७.१ नाशिक जिल्ह्यात फक्त भूजल मत्स्य व्यवसाय केला जातो. सूत व नॉयलॉन धाग्याची जाली व स्थानिक होड्यांच्या सहाय्याने ६८७ कि.मी. लांबीच्या ७ महत्वाच्या नद्या व तलाव क्षेत्रात मासेमारी केली जाते. संदर्भ वर्षात एकूण १०७७३ हेक्टर क्षेत्र भूजल मत्स्य व्यवसायाखाली आणले गेले. या क्षेत्रात संदर्भ वर्षात ८७.५७ लाख

मत्स्यबिजे तोडण्यांत आली व ७५६ मे.टन मत्स्य उत्पादनाचे मूल्य ६५.७० लाख रुपये इतके होते.

[८] बीज.

८.१ नाशिक जवळ एकलहरे येथील औष्णिक बीज उत्पादन केंद्र असून १९८८-८९ अखेरीस एकूण ४५८२.९३४ दशलक्ष युनिट बीज निर्मिती केली गेली.

८.२ विद्युतीकरण: १९८८-८९ या वर्षाअखेरीस जिल्ह्यातील १७४६ खेड्यांपैकी १७४२ खेड्यांचे व सर्व १९ नागरी भागांचे [शहरांचे] विद्युतीकरण झाले आहे.

८.३ बीज वापर: १९८७-८८ व १९८८-८९ या वर्षांत विविध कारणांसाठी केलेल्या बीज वापरावरची टक्केवारी खालील तक्त्यांत दिलेली आहे.

अ.क्र.:	बीज वापर प्रकार	बीज वापराची टक्केवारी	
		१९८७-८८	१९८८-८९
१]	घरगुती वापर	१९.१३	२०.१९
२]	व्यापारी कामासाठी	५.१३	५.२५
३]	औद्योगीक उत्पादनासाठी	६५.२३	६५.१३
४]	कृषि उत्पादनासाठी	१.१४	१.८३
५]	सार्वजनिक दिवाबत्ती	१.९७	०.६७
६]	इतर	७.४०	६.९३
७]	एकूण सर्व प्रकारांसाठी	१००.००	१००.००

[९] खनिजे व उद्योग.

९.१ खनिजे: जिल्ह्यात मौल्यवान तथा प्रमुख खनिजे उपलब्ध नाहीत. तथापी बांधकामाचा दगड, वालू, मुरूम, माती ही गौण खनिजे उपलब्ध आहेत. या गौण खनिजा पासून नाशिक जिल्ह्यात १९८८-८९ अखेरीस १९.५४ लाख रुपये स्वामित्व धन मिळाले.

९.२ उद्योग: जिल्ह्यातील १३ तालुक्यांपैकी नाशिक व मालेगांव या दोन तालुक्यांमध्ये उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली दिसून येते. नाशिक शहराचे परिसरांत विविध प्रकारचे मोठमोठे उद्योग उभारण्यांत आले आहेत. मालेगांव शहरांत मात्र हातमाग व यंत्रमागावरील कापड उत्पादन व त्यास पुरक असे उद्योगधंदे आहेत.

९.३ नोंदणीकृत कारखाने: जिल्ह्यात ३१ डिसेंबर-१९८८ अखेरीस नोंदणीकृत कारखान्यांची संख्या १०७५ होती त्यापैकी ९९७ कारखाने कार्यरत होते. त्या कारखान्यांमध्ये २६९६३ कामगार कामास होते. जिल्ह्यातील कारखान्यांची संख्या राज्यातील एकूण कारखान्यांच्या संख्येच्या ४.१९ टक्के आहे.

जिल्ह्यात असलेल्या कारखान्यांमध्ये प्रामुख्याने साखर उत्पादन करणारे, रासायनिक औषध तयार करणे, सूती कापड विणणे, प्लास्टीकच्या वस्तू तयार करणे, टायर व ट्यूब तयार करणे तसेच सिमेंट पाईप तयार करणे इत्यादी कारखाने आहेत.

९.४ औद्योगीक वसाहती/विकास महामंडळ: जिल्ह्यात एकंदर १३ औद्योगीक

वसाहतींना शासनाची मंजूरी प्राप्त झालेली आहे. परंतू प्रत्यक्षात नाशिक, मालेगांव, सिन्नर, मनमाड व येवला येथीलच औद्योगीक वसाहती कार्यान्वीत आहेत. नाशिक येथे महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडलाच्या सातपूर व अंबड या दोन वसाहती कार्यान्वीत आहेत. येउ व चिंचूर तालुका निफाड येथे महाराष्ट्र राज्य औद्योगीक विकास महामंडलातर्फे औद्योगीक वसाहती लवकरच सुरु होण्याची योजना आहे.

[१०] दळणवळण.

१०.१ लोहमार्ग: मध्य रेल्वेचा २४३ कि.मी. लांबीचा ब्रॉडगेज रेल्वेमार्ग जिल्ह्यातील इगतपूरी, नाशिक, निफाड व नांदगांव या तालुक्यातून जातो. तसेच मनमाड ते हैद्राबाद कडे जाणा-या मिटरगेज रेल्वेमार्गापैकी ४४ कि.मी. लांबीचा मार्ग नांदगांव व येवला या तालुक्यातून जातो.

१०.२ सर्व प्रकारचे रस्ते: ३१ मार्च १९८९ अखेर जिल्ह्यातील सर्व प्रकारचे १३०५३ कि.मी. लांबीचे रस्ते अस्तित्वात होते, त्यापैकी २५८१ कि.मी. लांबीचे रस्ते सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत तर ९४५० कि.मी. लांबीचे रस्ते जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली होते. याशिवाय महानगरपालिका, कटक मंडळ व नगर परिषदांचे हद्दीत १०२२ कि.मी. लांबीचे रस्ते होते.

जिल्ह्यातून जाणा-या दोन राष्ट्रिय महामार्गांची लांबी २७० कि.मी. तर १० राज्य महामार्गाची लांबी १६६६ कि.मी. होती. याशिवाय २०५४ कि.मी. लांबीचे प्रमुख जिल्हा रस्ते २२६९ कि.मी. इतर जिल्हा रस्ते तर ४३२० कि.मी. लांबीचे ग्रामीण रस्ते होते.

एकूण १३०५३ कि.मी. रस्त्यांपैकी सिमेंट काँक्रीटचे केवल ११८ कि.मी., डांबरी २६५९ कि.मी. खडीचे ८१७७ कि.मी. रस्ते होते तर उर्वरीत २०९९ कि.मी. लांबीचे रस्ते अपृष्ठांकीत होते.

१०.३ नोंदणीकृत वाहने: जिल्ह्यात मार्च-८९ अखेर वेगवेगळ्या प्रकारच्या वाहनांची संख्या १२०४७९ इतकी होती. मार्च-८८ अखेर ती संख्या १०६६२३ इतकी होती. एकूण १२०४७९ वाहनांपैकी ७७९४५ मोटारसायकल व स्कूटर्स, खाजगी मोटारी १२५८१, टॅक्सीज् १२०५ तर ६०५४ आटोरिक्षा होत्या. ट्रॅक्टर व मालवाहू लॉरींची संख्या अनुक्रमे ६०७५ व ८६४७ इतकी होती.

१०.४ मालाची वाहतूक/परिवहन संस्था: जिल्ह्यात ३१ मार्च-८९ चा स्थितीनुसार ७६२७ सार्वजनिक व १०२० खाजगी मालवाहतुकीच्या वाहनांची नोंदणी झाली आहे. जिल्ह्यात रेल्वे मार्ग मर्यादीत आहेत. जिल्ह्यातून प्रमुख राष्ट्रिय महामार्ग, राज्य महामार्ग व इतर जिल्हा रस्ते वाहतुकीसाठी उपलब्ध असल्याने जिल्ह्यांतर्गत तसेच जिल्ह्याबाहेरील माल वाहतूक करण्याचे दृष्टिने "रस्ता" हेच वाहतूकीचे प्रमुख साधन

झाले असल्याने जिल्ह्यात माल वाहतूक संस्थांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरले आहे.

१०.५ प्रवासी वाहतूक: संदर्भ प्रवासी नाशिक जिल्ह्यात राज्य परिवहन मंडळाच्या एकेस ५७६१६ कि.मी. लांबीच्या ९८७ मार्गावरून प्रवासी वाहतूक करीत होत्या. प्रवासी वाहतूकीपासून १९८८-८९ या साली राज्य परिवहन महामंडळास १३.१८ कोटी रूपये उत्पन्न मिळाले.

१०.६ टपाल व तार कार्यालये: मार्च-८९ अखेरीस जिल्ह्यात ६३६ डाकघरे व ११२ तार कार्यालये होती.

१०.७ दूरध्वनी केंद्रे आणि दूरध्वनींची संख्या: ३१ मार्च १९८९ अखेर जिल्ह्यातील एकूण ७१ दूरध्वनी केंद्रातून २२०१९ दूरध्वनी कार्यरत होते.

१०.८ दूरचित्रवाणी: जिल्ह्यात तांत्रिक सहाय्यक उपविभागीय ग्रामीण ध्वनीक्षेपण दूरचित्रवाणी नाशिक यांचे मार्फत मार्च-१९८९ अखेर ५४७ दूरचित्रवाणी संचाचे सार्वजनिक उपयोगासाठी वाटप करण्यात आले.

[११] श्रम व रोजगार.

११.१ औद्योगीक विवाद: १९८८ मध्ये जिल्ह्यात ८६८ औद्योगीक तंटे व ४ टाळेबंदी प्रकरणे झाली. तसेच १९८८ साली कारखान्यात ९४ अपघात घडून आले त्यामुळे ७८१३ श्रमदिवस वाया गेले.

११.२ रोजगार: १९८८-८९ मध्ये सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील मिळून एकूण १४३५९९ लोक काम करीत होते. त्यांतील अंदाजे ३२ टक्के लोक खाजगी क्षेत्रात तर ६८ टक्के लोक सार्वजनिक क्षेत्रात काम करीत होते.

११.३ रोजगार विनिमय: नाशिक येथे एक रोजगार विनिमय केंद्र असून मार्च-१९८९ अखेर ११७२८७ अर्जदारांची नोंदणी झालेली होती. सन-१९८७-८८ पेक्षा ३ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. मार्च-८९ अखेर सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात अनुक्रमे ६३४ व १०४ उमेदवारांना नोकरी देण्यात आली.

११.४ औद्योगीक प्रशिक्षण संस्था: जिल्ह्यात मार्च-१९८९ अखेरीस अभियांत्रिकी महाविद्यालये, २ तंत्रनिकेतन व ८ औद्योगीक प्रशिक्षण संस्था आहेत.

[१२] सहकार:

१२.१ सर्व प्रकारच्या सहकारी संस्था: जिल्ह्यात ३०.६.८९ अखेरीस ४२८९ सहकारी संस्था होत्या व त्यांची सभासद संख्या ८.५५ लाख होती.

१२.२ कृषिवत/बिगर पतसंस्था: ३० जून-१९८२ अखेर असलेल्या एकूण सहकारी संस्थापैकी २८ टक्के म्हणजेच ११७४ सहकारी पतसंस्था असून त्यापैकी ८१३ कृषि पतसंस्था व ३६१ बिगर कृषि पतसंस्था आहेत. त्यांची टक्केवारी अनुक्रमे ७० व ३० प्रतिशत अशी आहे.

१२.३ सहकारी बिगर पतसंस्था: जिल्ह्यातील जून-८९ अखेर असलेल्या एकूण सहकारी

संस्थांपैकी बिगर पतसंस्थांची संख्या ३११५ म्हणजेच एकूण सहकारी संस्थांच्या ७२ टक्के अशी होती. त्यांत घरबांधणी[४४.७५ टक्के], कामगार कंत्राट [११.६२ टक्के] व उपसा जलसिंचन [४.५९ टक्के] या प्रमुख संस्था होत्या.

१२.४ सहकारी संस्थांचे सभासद: जिल्ह्यातील एकूण सहकारी संस्थांच्या १०.९३ लाख सभासदांपैकी प्राथमिक कृषि सहकारी संस्थेचे २२.७२ टक्के, ग्रेतकरी सेवा संस्थेचे ०.५६ टक्के व आदिवासी प्राथमिक सहकारी संस्थेचे १०.५१ टक्के सभासद होते.

१२.५ जिल्ह्यात असलेल्या एकूण ८११ कृषि पतसंस्थांनी जून-८९ अखेर ९१५४.६६ लाख रुपये कर्ज वाटप केले.

[१३] बँका - विमा.

१३.१ जिल्ह्यात डिसेंबर-१९८८ अखेर राष्ट्रीयकृत व बिगर राष्ट्रीयकृत अशा एकूण २०८ बँकशाखा कार्यरत होत्या, १९८८ या वर्षात ११ शाखा कार्यालये नव्याने सुरू करण्यात आली. जिल्ह्यातील बँका मार्फत शासनाच्या विविध योजना राबविण्याच्या कामी सुकरता व समन्वय साधन्याच्या दृष्टिने "बँक ऑफ महाराष्ट्र" ही "अग्रणी बँक" म्हणून काम करीत आहे.

१३.२ पतठेवी प्रमाण: संदर्भ वर्षात वर्गीकृत बँकामध्ये ३५३९२ लाख रुपयांच्या ठेवी होत्या व या बँकांनी एकूण २३८५६ लाख रुपयांची कर्जे वाटप केली. वर्षभरातील पत ठेवींचे प्रमाण ६७.४० टक्के इतके होते.

१३.३ विमा व्यवसाय: आयुर्विमा महामंडळाने १९८८-८९ या वर्षात ३७४९४ व्यक्तींचे ९६ कोटी१ लाख रुपये किंमतीचे विमे उतरविले.

[१४] किंमती.

१४.१ घाऊक किंमती: मागील वर्षाच्या तुलनेने १९८८ मध्ये गहू, हरभरा, भुईमूग व कडधान्य यांच्या घाऊक किंमतीत वाढलेल्या आहेत.

१४.२ किरकोळ किंमती: १९८८ या वर्षातील महत्त्वाच्या खाद्य वस्तूंच्या प्रतिकिलोच्या वार्षिक सरासरी किंमती पुढील प्रमाणे होत्या. गहू रू. ३.२०, तांदूळ [मध्यम] रुपये ५.६२, बाजरी रू. २.६८, ज्वारी रू. २.६८, हरभरा डाळ रू. ८.७०, मुगडाळ रू. ११.३७, तूरडाळ रू. ११.६२, उडिदडाळ रू. ९.७८, साखर रू. ६.७९, गुळ रू. ६.०८, शेंगदाणा तेल रू. २३.८३, तूप [वनस्पती] रू. २५.९९, मिरची [कोरडी] रू. २७.०६. अखाद्य वस्तूंच्या किंमती पुढील प्रमाणे होत्या साबणबार [५०१ टाटा] रू. ८.७१, पितळी भांडी रू. ६४.१० किलो. साडी रू. ५५.९३, सद-याचे कापड रू. २४.०० प्रतिमिटर, पोलक्याचे कापड रुपये ६.६६ प्रतिनग [७० सें.मी.]

१४.३ ग्राहक किंमती निर्देशांक: पायाभूत वर्ष १९६१ = १०० या प्रमाणात जळगांव केंद्राचा कामगारांच्या ग्राहक किंमतीचा निर्देशांक १९८८-८९ या वर्षात सर्वसाधारणपणे

सरासरी ७७७ इतका होता. तो १९८७-८८ मध्ये ७१५ होता. १९८८-८९ चा अखेरीस जास्त जानेवारी-८९ मध्ये ८३० इतका तर सर्वात कमी मे-८८ मध्ये ७२६ एवढा होता.

[१५] शैक्षणीक संस्था:

१५.१ सन-१९८७ चा अखेरीस जिल्ह्यात स्वतंत्ररित्या असलेल्या ११ बालवाड्या, २८८१ प्राथमिक शाळा [एकशिक्षकी कनिष्ठ व उच्च प्राथमिक शाळांचा समावेश असलेल्या] ३१४ माध्यमिक शाळा व ६० उच्च माध्यमिक शाळा कार्यरत होत्या. तसेच सामान्य शिक्षणाची महाविद्यालये २३ होती. संदर्भ अखेरीस प्राथमिक शाळेत एकूण ४९२००८, माध्यमिक शाळेत २४५०८३ व महाविद्यालयांत ३७८२९ विद्यार्थी शिक्षण घेत होते.

१५.२ प्रौढ शिक्षण: सन-१९८८-८९ ह्या अखेरीस जिल्ह्यात प्रौढ शिक्षणाचे १००० वर्ग होते, त्यातील लाभार्थी संख्या ३० हजार इतकी होती.

[१६] वैद्यकीय व सार्वजनिक सेवा.

१६.१ वैद्यकीय सेवा: राज्य सरकार, स्थानिक संस्था व तसेच सेवाभावी संघटना व खाजगी व्यक्तींमार्फत जिल्ह्यात वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. सन-१९८८ मध्ये जिल्ह्यात एकूण ४१ रुग्णालये, ९३ दवाखाने व ८८ प्रसूतीगृहे असून ९५ प्राथमिक आरोग्य केंद्रे होती. सार्वजनिक व अर्थसहाय्यीत वैद्यकीय संस्थातील खाटांची संख्या २५०४ होती. १९८८ चा संदर्भ अखेरीस १६७००० आंतररुग्णावर व २३०२७०० बाह्यरुग्णावर उपचार करण्यात आले.

१६.२ जन्म-मृत्यू संख्या: १९८८ चा अखेरीस ग्रामीण व नागरी भागांत अनुक्रमे ४६२०९ व ४२०५० जन्म तर १३००३ व ८६६७ मृत्यू झाले. बालमृत्यू मध्ये ग्रामीण भागात ११२२ व शहरी भागांत १४७९ मृत्यू होते.

१६.३ कुटुंब कल्याण कार्यक्रम: जिल्ह्यात एकूण १०० कुटुंब कल्याण केंद्रे असून ग्रामीण स्तरावर ९० व नागरी स्तरावर १० केंद्रे होती. सन-१९८८-८९ मध्ये निर्वीजीकरण केलेल्यांची संख्या २३५४७ तर लूप पध्दतीचा अवलंब केलेल्या स्त्रियांची संख्या १०६८९ होती. संदर्भ अखेरीस जननक्षम जोडप्यांची संख्या ४.५२ लाख इतकी होती.

१६.४ पाणी पुरवठा: जिल्ह्यात १९८८-८९ अखेरीस नागरी व ग्रामीण स्तरावर १७७ ठिकाणी विहिरीचे पाणी नळाने पुरविले गेले. इतर ठिकाणी नद्या, कूपनलिका व तलाव याव्दारे विहिरीच्या पाण्याची सुविधा उपलब्ध होती. १६२ खेड्यांना टँकर्स किंवा बैलगाडीने पाणी पुरवठा केला गेला.

[१७] दुर्बल घटक:

१७.१ रोजगार हमी योजना: नवीन २० कलमी कार्यक्रमाव्दारे दुर्बल घटकांसाठी ज्या विविध योजना राबविण्यात आल्या त्यांत १९८८-८९ मध्ये रोजगार हमी योजनेवर

११९४ लाख रुपये खर्च करण्यांत आले व रोजगार हमी योजनेच्या विविध ११८६ कामांवर ५१.९४ लाख मनुष्य दिवस रोजगार निर्मीती झाली.

१७.२ नविन २० कलमी कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात खालील प्रमाणे उद्दिष्टे पूर्ण करण्यांत आली.

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत १०९७९ नविन ८२३९ दुबार लाभार्थींना ३३८.६८ लाख रुपये खर्च करण्यांत आले. एकूण लाभार्थीत १०५२ अनुसूचित जमातीचे तर ३७६३ लाभार्थी अनुसूचित जनजातीचे होते.

राष्ट्रिय ग्रामीण रोजगार कार्यक्रमांतर्गत २३८.३९ लाख रुपये खर्च करण्यांत आले. असून १२.६४ लाख मनुष्य श्रमदिन निर्माण झालेत. तसेच ग्रामीण भुमीहीन रोजगार हमी कार्यक्रमांतर्गत २२९.६४ लाख रुपये खर्च झाला असून १४.३१ लाख मनुष्य श्रमदिन निर्माण करण्यांत आले.

ग्रामीण भागातील बेघर कुटुंबांना घरासाठी जागा देणे व बांधुकाम सहाय्य कार्यक्रम विस्तार अंतर्गत १७४३ कुटुंबांना लाभ मिळाला. तसेच कमी उत्पन्न गटासाठी असलेल्या १२८१ लाभार्थींना प्लॉट वाटप करण्यांत आले.

जिल्हा परिषदेमार्फत एकूण १६५६ बायोगॅस संयंत्र बसविण्यांत आले. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळातर्फे केंद्रिय सहाय्य विशेष सहाय्य योजनांतर्गत ५५८ लाभार्थींना १६.७६ लाख रुपयांचे सहाय्य देण्यांत आले.

विशेष घटक कार्यक्रम अनुसूचित जातीसाठी एकूण विविध योजनांखाली ५८.११ लाख रुपये खर्च करण्यांत आले व २६०५ व्यक्तींना लाभ देण्यांत आला.

<u>जिल्हा नियोजन</u>: सन-१९८८-८९ या वर्षात बिगर आदिवासी, आदीवासी उपयोजना, राज्यनिधी योजना व अनुशेष योजना मिळुन एकूण खर्च रुपये ३५६९ लाख झालेला होता. त्यापैकी आदिवासी उपयोजनांतर्गत रुपये ७५३.९० लाख एवढा खर्च झालेला होता. सन-१९८७-८८ या वर्षाशी तुलना केली असतां ८८-८९ या वर्षात झालेल्या खर्चामध्ये २३.४९ टक्क्यांनी वाढ झालेली दिसून येते.

[१८] <u>संकीर्ण.</u>

१८.१ <u>नगरपरिषदा आणि जिल्हा परिषद</u>: जिल्ह्यात ९ नगरपरिषदा, १ कटक मंडळ व १ महानगरपालिका असून त्यांचे १९८८-८९ या वर्षाचे उत्पन्न ५४११.५७ लाख रुपये होते. त्यापैकी अनुदानाव्दारे ९७६.७६ लाख, कराव्दारे ३७३०.५९ लाख, महसूलाव्दारे ३९६.८२ लाख व इतर बाबींपासून ३७७.४० लाख रुपये उत्पन्न मिळाले. एकूण खर्च रुपये ५१२९.४२ लाख झाला असून त्यापैकी सामान्य प्रशासनावर २११.४३ लाख, सार्वजनिक आरोग्य १२५३.६० लाख, सार्वजनिक बांधकामावर ८९६.६५ लाख तर शिक्षणावर ६७५.४४ लाख रुपये व इतर बाबींवर २०९२.३० लाख रुपये खर्च करण्यांत आला.

१९८८-८९ या वर्षाति जिल्हा परिषदेचे एकूण उत्पन्न ७२१ लाख रूपये व एकूण खर्च ७५२० लाख रूपये इतका होता. १९८७-८८ चा तुलनेत १९८८-८९ मधील जिल्हापरिषदेचे उत्पन्न १.५९ टक्क्यांनी तर खर्चाचे प्रमाण ७.९७ टक्के वाढलेले दिसते.

